कनिष्ठ लेखाधिकारी पदावरुन सहाय्यक लेखाधिकारी पदावर पदोन्नतीकरीता असलेल्या विभागीय परीक्षेबाबत..

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व पंचायत राज विभाग
**शासन पुरकपत्र क्रमांकः परीक्षा-२०२५/९१८/प्र.क्र.१९३/आस्था-८,**
बांधकाम भवन, पहिला मजला, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ३१ जुलै, २०२६.

वाचा :-

१. वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेवाप्र-२०२२/प्र.क्र.८६/कोषा प्रशा-३, दि.०६.१०.२०२२.
२. ग्रामविकास व पंचायत राज विभाग शासन निर्णय क्र.परीक्षा २०२५/९१८/प्र.क्र.१९३/ आस्था-८, दि.१८.०२.२०२६.
३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे क्र.संलेको/परीक्षा/म.जि.प.वि.ले.से.परीक्षा/६-२०२६/६८, दि.२२.६.२०२६ चे पत्र.
४. अपर आयुक्त (विकास) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ विभागीय परीक्षा समिती, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे क्र.विशा/कार्या-४/लेखा-१/परीक्षा/२०२६, दि.२३.६.२०२६ चे पत्र.
५. अपर आयुक्त (आस्थापना), कोकण विभाग यांचे क्र.विशा/कार्या-४/लेखा-१/परीक्षा/कॉम्प.नं.३१२५०१७/२०२६, दि.६.७.२०२६ चे पत्र.
६. ग्रामविकास व पंचायत राज विभाग शासन पत्र क्र.परीक्षा २०२५/प्र.क्र.१९३(भाग-१)/आस्था-८, दि.२४.०७.२०२६.

शासन पुरकपत्र:-

उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये कनिष्ठ लेखाधिकारी पदावरुन सहाय्यक लेखाधिकारी पदावर पदोन्नतीकरीता असलेली विभागीय परीक्षेकरीता सुधारीत अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला असून परीक्षेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर विभागीय परीक्षा लेखा व कोषागारे संचालनालयाचे स्तरावरुन आयोजित करण्यात येणार आहेत.

२. तथापि, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांनी काही मुद्यांबाबत स्पष्टता असणे आवश्यक असल्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे अतिरिक्त सूचना देण्यात येत आहेत :-

१. कनिष्ठ लेखाधिकारी पदावरुन सहाय्यक लेखाधिकारी पदावर पदोन्नतीकरीता असलेल्या विभागीय परीक्षेस बसण्यासंबंधीची उमेदवारांची पात्रता/अपात्रता निश्चित करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. तसेच, परीक्षार्थीचा सेवा अभिलेख मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे संबंधित परीक्षेच्या अर्जाची छाननी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.
२. विभागीय परीक्षेसाठी येणारा खर्च खाली नमूद लेखाशिर्षांतून करण्यात यावा. :-

| अ.क्र. | **सविस्तर लेखाशिर्ष** |
|---|---|
| १ | मागणी क्रमांक एल-२ खालील लेखाशिर्ष-२०५३, जिल्हा प्रशासन (१०१) आयुक्त (०१) निरीक्षण पथकावरील खर्च (०१) (०१) पंचायत राज संस्थांसाठी निरीक्षण पथके (अनिवार्य) (दत्तमत) (२०५३ ०५९२) |

| | |
|---|---|
| | १३-कार्यालयीन खर्च |
| २ | मागणी क्रमांक एल-२ खालील लेखाशिर्ष-२०५३, जिल्हा प्रशासन (१०१) आयुक्त (०२) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या प्रशासन (०२) (०१) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या प्रशासन (अनिवार्य)(दत्तमत) (२०५३ ०६०९)<br>१३-कार्यालयीन खर्च |

३. परिक्षेसाठी येणाऱ्या खर्चाची मागणी संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्याकडुन आल्यानंतर BEAMS प्रणालीवर संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण यांचेकडे वर्ग करण्यात येईल.

४. शासन निर्णय दि.१८.२.२०२६ नुसार परीक्षेचा सुधारीत अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे. शासन निर्णय दि.२५.६.१९८६ मध्ये समाविष्ठ असलेला भाग-२ मधील पेपर क्रमांक ५ Precis and Drafting या विषयाचा समावेश सुधारीत अभ्यासक्रमात करण्यात आलेला नाही. यास्तव केवळ पेपर क्र.५ या विषयात अनुत्तीर्ण झाले आहेत व इतर सर्व विषयात उत्तीर्ण अथवा सुट मिळालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांना नविन परीक्षेच्या धोरणानुसार केवळ पेपर क्र.५ मध्ये सूट देऊन उत्तीर्ण घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. पेपर क्र.५ वगळून इतर पेपर क्र.१,२,३,४,६,७ व ८ यापैकी कोणत्याही पेपरमध्ये उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण/ सूट मिळाली असेल, अशा सर्व कर्मचाऱ्यांना यापुर्वीच्या परीक्षेत पेपरमध्ये मिळालेल्या सूट रद्द कराव्यात व सुधारीत शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यास सर्व विषय घेऊन परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात येत आहे.

३. सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७३११६३५३६७१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUPRIYA KISHANRAO GHOTALE

Digitally signed by SUPRIYA KISHANRAO GHOTALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Rural Development Dept, 2.5.4.20=FEF4727E7E9784DAC57E77EC93428316B1D6F2525552E0CB821F7697EAF74007, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=303C0731B4F8DFB924149F646828C3458ED7B0EBF9D144882376273F83EB8B80, cn=SUPRIYA KISHANRAO GHOTALE
Date: 2026.07.31 17:02:07 +05'30'

(सुप्रिया कि.घोटाळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५. मा. संसद सदस्य/मा.विधीमंडळ सदस्य (सर्व),
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/विधानपरिषद), मुंबई
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१०. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
११. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
१२. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.

१३. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१५. विभागीय आयुक्त व अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).
१६. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई
१७. सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषगारे,
१८.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२०. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
२१. सामान्य प्रशासन विभाग (का.१४अ/१४ब, का.१२, का.१९), मंत्रालय, मुंबई.
२२. वित्त विभाग (कोषा प्रशा-३), मंत्रालय, मुंबई.
२३. निवड नस्ती - आस्था-८